# पाथेय- भाग १

डॉ. सहदेव चौगुले-शिंदे
एम.ए., पीएच.डी., एलएल. बी.
माजी प्राचार्य, नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स
ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर.

A72
रिया पब्लिकेशन्स्

**पाथेय- भाग १ (चरित्रसंग्रह) : डॉ. सहदेव चौगुले-शिंदे**

© **सौ. विजया सहदेव चौगुले-शिंदे**
''सालस'', ११८२/१८३, प्लॉट नं. १५,
८ वी गल्ली, राजारामपुरी (पूर्व),
कोल्हापूर - ४१६ ००८
फोन : ०२३१ - २५२८४५६,
मोबा : ९८२३४३१२८२

**प्रकाशक**
रियापब्लिकेशन्स्
२५०, ब - ३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४ २१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्रसावंत
९८८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**रेखाचित्रकार**
दत्तात्रय चौगुले-शिंदे, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये १६०/-

**भेडसगाव**
**व**
**वारणेच्या परिसरास**

**'ही भेट, हा उमाळा. पाथेय यात्रिकाला'**
**-कवी यशवंत**

१० एप्रिल, १९७९

**प्रो. सहदेव चौगुले**

स.न.वि.वि.

तुमचे पत्र मिळाले. तुमचा–माझा परिचय झाला ही फार चांगली गोष्ट आहे. इंग्रजी वाङ्‌मय तुमच्या व्यासंगाचा विषय आहे पाहून साहित्यावर लिहिण्याबोलण्याचा तुमचा अधिकार मान्य केला पाहिजे. तुमच्या ओळखीने मला फार बरे वाटले.

तुम्ही तुमच्या पत्रात भेडसगांव–वारणाचा उल्लेख केला आहे म्हणून सहज आठवण झाली. भेडसगावच्या कुलकर्णी कुटुंबातील दोन बंधू माझ्याबरोबर कराडच्या शाळेत होते. त्यांच्याबरोबर एकदा भेडसगावला येऊन राहून गेलो होतो. याची आठवण ताजी झाली. तुमच्या प्रबंध लिहिण्याच्या इच्छेला मी सहाय्यभूत झालो तर मला जरूर आनंद वाटेल. माझ्याजवळ असलेली साधनं मी तुमच्या स्वाधीन करीन.

ऋणानुबंध तुम्हाला आवडले वाचून आनंद झाला. पत्राबद्दल आभार.

कळावे,

आपला

१४ जून, १९७९

**प्रो. सहदेव चौगुले**

स.न.वि.वि.

तुमचे २३ मेचे पत्र मिळाले. २१ मे नंतर पंधरा दिवस दिल्लीबाहेर होतो त्यामुळे पत्रास थोडा उशीर झाला. तुमच्या पत्रात लिहिलेला आराखडा मी पाहिला. यासंबंधाने मला सांगण्यासारखे काहीच नाही. साधने पुरविण्याच्या प्रश्नाविषयी आपण लिहिले आहे. त्यापैकी जी पुस्तके मजजवळ आहेत ती मी जरूर देईन. त्यापैकी ऋणानुबंध मजजवळ नाही. परंतु सह्याद्रीचे वारे, युगांतर, इतिहासाचे एक पान, विन्ड्स ऑफ चेंज ही पुस्तके आपण म्हणाल तेव्हा मी पाठवून देईन.

कळावे,

आपला

# प्रस्तावना...

डॉ. सहदेव चौगुले-शिंदे यांचा हा आटोपशीर चरित्रसंग्रह वाचला. मला तो आवडला. वक्ते आणि कार्यकर्ते यांच्या हाताशी अशी पुस्तके सतत असावीत. या पुस्तकाचे लेखन संयमाने आणि सुंदरतेने घडले आहे.

जागोजाग आवश्यक त्या संदर्भांचा निर्देश आढळतो. त्यामुळे लेखनातील अचूकता वाढली आहे. या पुस्तकात डॉ. राधाकृष्णन, महात्मा फुले, अल्बेर काम्यू, यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणे शरदराव पवार यांचीही चरित्ररेखा आढळते. लेखकाच्या निराग्रही वृत्तीची ही साक्ष आहे. मोठेपणाच्या परी आणि प्रकार अनेकविध असू शकतात ही जाण प्राचार्य चौगुले-शिंदे यांच्या लिहिण्यात आढळते.

टागोर आणि छत्रपती शाहू महाराज हे मोठेपणाचे दोन मनोरे डोळ्यांपुढे उभे करणाऱ्याचे मनही मोठे असावे लागते. प्रा. सहदेव चौगुले-शिंदे यांच्या लेखणीला बळ पुरविणारे त्यांचे मन 'सह-देव' या नावाला शोभेल असेच आहे.

या पुस्तकातील परस्परभिन्न प्रकृतीच्या व्यक्तींचे जे जीवनदर्शन वाचकाला घडते त्यावरून 'अजब' या नावाचा उलगडा होतो. लेखक, विषय आणि प्रकाशक सगळेच अजब म्हटले पाहिजे.

लेखकाचे मनोगत व्यक्त करताना आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य चौगुले-शिंदे म्हणतात : ''वाचनात मी कधी कसलाच भेदभाव केला नाही. त्यामुळे जिथे जे चांगले सापडेल ते घेत गेलो. कधी सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, नित्से, सार्त्र यांनी माझ्या मनाचा ताबा घेतला. तर कधी टिळक, आंबेडकर, विनोबा, गांधी... यांच्या विचार आणि वर्तनाचा ठसा मनावर खोल उमटला.''

एका विनम्र अभ्यासकाने अगत्यपूर्वक आणि अभ्यासपूर्वक केलेले हे चरित्रचिंतन वाचकांना श्रीमंती प्रदान करील असा विश्वास वाटतो.

आपल्या प्रकाशन-निष्ठेने व साहित्यसेवेने मराठी ज्ञानभांडारात अखंड भर टाकणाऱ्या मेहता मंडळींस धन्यवाद.

**फलटण**
दि. ३-१२-२००५

**- प्राचार्य शिवाजीराव भोसले**

# लेखकाचे मनोगत...

एकदा जन्म झाल्यानंतर शेवटपर्यंत जगण्याचा निसर्गदत्त हक्क सर्वांनाच जन्माबरोबर प्राप्त होतो. काहीही न करता जगता येते हे आजपर्यंत कित्येकांनी सिद्ध केले आहे. स्वमग्न राहून स्वत:साठी जगणे हे जीवनसूत्र मानून बहुतांश लोक तसे वागत आले आहेत. कधी भूतकालीन वैभवाचा आधार घेत तर कधी भविष्याचे स्वप्न उराशी बाळगून वर्तमानकाळाशी फारकत घेणाऱ्यांचीही संख्या कमी नाही. परंतु वर्तमानकाळाशी आपले प्रथम आणि प्रमुख नाते, देणे मानणारी, वर्तमानकाळ पूर्णपणे व समर्थपणे जगणारी माणसेच भविष्यकाळाला आणि भूतकाळाला काही देत असतात. जे काळालाच काही देतात त्यांना काळही काही देत असतो, जतन करून ठेवत असतो. माणूस आणि काळ यांचे असे अतूट नाते निर्माण होते तेव्हाच त्याला काळाशी एकरूप होणे असे म्हणतात. आपला वर्तमानकाळ हा इतिहासाचा एक भाग आहे आणि भविष्यासाठी एक वाट ठरणार आहे अशी प्रगल्भ, प्रज्ञानी जाण ठेवून जे जगतात तेच इतिहासाच्या पुस्तकात आपले एक पान निश्चित करून जातात. सामान्यपणे गुणग्राहकतेबद्दल वर्तमानकाळ हा मितभाषी असतो, तर भूतकाळ हा मिथ्यापवाद दूर करणारा असतो. साठवण आणि आठवण हे इतिहासाचे दोन प्रमुख गुणधर्म असल्यामुळे संस्कृतीचे संवर्धन होते, मानवतेचे शिक्षण होते.

मानवी संस्कृती संपन्न करणाऱ्या आणि तिला दिशा देणाऱ्या थोर विभूती प्रत्येक काळात देशोदेशी होऊन गेल्या आहेत. संस्कृतीच्या या महासागरात 'पाथेय'मधील विभूतींचे योगदान हे अविस्मरणीय आहे असेच म्हणावे लागेल. त्यातील जे जल माझ्या हाती आले ते 'पाथेय' म्हणून मी वाचकांच्या हाती देत आहे.

शाळा-महाविद्यालयात शिकत असताना थोरामोठ्यांची चरित्रे, आत्मचरित्रे वाचायचा छंद जडला. त्यातून मनावर काही संस्कार झाले. संस्कारातून जीवनाला दिशा मिळाली, कृती अर्थपूर्ण होत गेली.

जे वाचले त्याच्यावर चिंतन, मनन झाल्यामुळे काही नवे विचार स्फुरले. त्या विचारांना एकत्रित करता यावे म्हणून काही थोर विभूतींवर मी लेखन केले आणि ते वेळोवेळी प्रसिद्ध झाले.

वाचनात मी कधी कसलाच भेदभाव केला नाही. त्यामुळे जिथे जे चांगले सापडेल ते घेत गेलो. कधी सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, नित्से, सार्त्र, काम्यू, रसेल या पाश्चात्त्य तत्त्वज्ञांनी माझ्या मनाचा ताबा घेतला; तर कधी महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, पंडित जवाहरलाल नेहरू, रवींद्रनाथ टागोर, डॉ. राधाकृष्णन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, विनोबा भावे आणि शरदराव पवार यांच्या विचार आणि वर्तनाचा मनावर खोल ठसा उमटला. या सर्वांचे सर्वच साहित्य मी वाचले आहे असा माझा दावा नाही. या सर्वांवर मी लिहू शकलो नाही ही मात्र माझी खंत आहे. तरीही जे काही लेखन माझ्या हातून झाले आहे ते ग्रंथरूपाने प्रसिद्ध करावे असा विचार माझ्या मनात आला. ‘पाथेय’ जन्माला आले ते असे.

‘पाथेय’ मधील निम्म्याहून जास्त लेखन पूर्वी लेखरूपाने विविध प्रसंगी प्रसिद्ध झाले होते. त्या लेखनात फारसा बदल न करताच त्याचा इथे समावेश केला आहे. त्या दैनिकांच्या संपादकांचा मी आभारी आहे.

आज ‘पाथेय’ भाग १ ची तिसरी आवृत्ती निघत आहे हेच ग्रंथाचे श्रेय.

थोर विचारवंत, गाढे अभ्यासक व मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी ‘पाथेय’साठी प्रस्तावना देऊन लेखक आणि प्रकाशक यांना उपकृत केले आहे. मी त्यांचे आभार मानतो व त्यांचा लोभ सतत राहील अशी अपेक्षा करतो.

माझ्या प्रत्येक कार्यात शुभ चिंतणारे माझे कुटुंबीय, नातलग, मित्र, सहकारी आणि असंख्य विद्यार्थी यांनी वेळोवेळी दिलेली प्रेरणा व दिलखुलास पसंती हेच माझे सामर्थ्य आहे. या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

प्रकाशक श्री. उल्हास डी. मेहता व श्री. शितल मेहता या पिता-पुत्रांच्या अमोल सहकार्यानेच ‘पाथेय’ वाचकांसमोर येत आहे. मुखपृष्ठकार श्री. विशाल कुमठेकर, रेखाचित्रकार श्री. दत्तात्रय चौगुले -शिंदे यांचे अविरत श्रम ‘पाथेय’च्या पाठीशी आहेत. या सर्वांचे आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

शेवटी आई-अण्णा, बंधू बळवंत-अनुसया, आकाराम-लक्ष्मी, मामा-मामी, विजया, बाबा-मानसी, दिलीप-सुनंदा, अशोक-मीनल, रोहित-प्रीती, नितीन-नम्रता, रंगा-कांता, शीला, श्वेता, अस्मिता, सोनू, पिया, अनिकेत व सूचंता या सर्वांचे माझ्यावरील प्रेम हे माझ्या जीवन प्रवासात एक मौल्यवान ‘पाथेय’च होय. यांना विसरतो म्हटले तरी विसरता येणार नाही, हेच खरे.

**- डॉ. सहदेव चौगुले-शिंदे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | महात्मा गांधी | १७ |
| २. | कविमनाचे नेहरू | २५ |
| ३. | यशवंतराव चव्हाण | ४१ |
| ४. | सॉक्रेटिस | ६२ |
| ५. | स्वामी विवेकानंद | ७१ |
| ६. | रवींद्रनाथ टागोर | ८० |
| ७. | डॉ. राधाकृष्णन | ८५ |
| ८. | अल्बेर काम्यू | १०१ |
| ९. | महात्मा फुले | १०७ |
| १०. | शाहू महाराज | ११६ |
| ११. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | १२५ |
| १२. | शरदराव पवार | १३५ |
| १३. | विनोबा भावे | - |
| १४. | टॉमस पेन | - |
| १५. | टॉमस जेफरसन | - |


✦✦



१

# महात्मा गांधी : एक सत्यवादी

प्रत्येक महापुरुष हा दिसतो, कळतो त्यापेक्षा कितीतरी महान असतो. कधीकधी त्यांची तुलना अथांग सागराशी, विशाल विस्तृत आकाशाशी व उंच पर्वतशिखरांशी केली जाते. महापुरुषांचा शोध हा क्षितिजाच्या शोधासारखा असतो, सतत वृद्धिंगत होत विस्तारत जाणारा. अखिल मानवतेला वेगळे काही सांगण्याचा, देण्याचा व संस्कृतीला नवी दिशा देण्याचा ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केला त्यात महात्मा गांधींचा निश्चितच समावेश करावा लागेल. महात्मा गांधी म्हणजे भारतीय जीवनातील परंपरांचे, तात्त्विकतेचे व नैतिकतेचे सारच होय. त्यांचे मन विशाल होते, त्यांचा आत्मा उदार होता, त्यांची वाणी आणि राहणी नेहमी साधी, सरळ होती पण त्यांना त्यांची म्हणून एक उंची होती. त्यांनी आपले जीवन हे एक प्रयोग आहे असे समजले आणि त्यामुळे ते सतत प्रवाही राहिले. महापुरुषांच्या महामार्गाला अनेक वाटा, पायवाटा असतात. त्यांचा शोध घेणे म्हणजे महापुरुषांच्या अंतरंगात घुसणे होय. उच्च दर्जाचे आदर्श कृतीत आणून गांधीजींनी कित्येकदा आपल्या साध्या साध्या कृतींना तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्याला महात्मा गांधींचे नेतृत्व लाभले. त्यावेळी त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील कार्याची शिदोरी त्यांच्या पाठीशी होती. स्वातंत्र्यलढा एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचला होता. इंग्रज सरकारच्या अत्याचाराने कळस गाठला होता. प्रबळ परकीय सत्तेविरुद्ध शस्त्राने लढण्याची आपल्या देशाची तयारी नव्हती. अशा वेळी स्वातंत्र्यलढ्याला नैतिक आणि तात्त्विक बैठकीची गरज होती आणि गांधीजींनी ती पूर्ण केली. त्यांनी असहकार, सविनय प्रतिकार, सत्याग्रह, अहिंसा, आत्मनिर्धार, मौन, उपवास इत्यादी शस्त्रे वापरून हळूहळू इंग्रज सरकारला निरुत्तर करत करत स्वातंत्र्य द्यायला प्रवृत्त केले.

लोकमान्य टिळकांनी सर्व देशभर ब्रिटिश सरकारविरुद्ध असंतोषाची लाट निर्माण केली. पुढे गांधीजींनी त्या असंतोषाचे जनआंदोलनात रूपांतर केले. त्या जनआंदोलनाला त्यांनी दक्षिण आफ्रिकेत यशस्वी झालेले सत्याग्रहाचे तंत्र आणि तत्त्वज्ञान दिले. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी अखेरपर्यंत आग्रह. सत्य आणि केवळ सत्यालाच प्राधान्य. त्यांचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान हे सत्य, अहिंसा, प्रेम, दया आणि आत्मविश्वासावर अवलंबून होते. सत्याग्रही व्यक्तीने सत्याचा आग्रह धरताना जुलूमकर्त्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची द्वेषभावना वा शत्रुत्व बाळगता कामा नये असा त्या तत्त्वज्ञानाचा संदेश वा आदेश होता. सत्याग्रही व्यक्तीने साधनशुचिता पाळली पाहिजे याबद्दल गांधीजी सतत दक्ष असत. सत्याग्रहाचे तंत्र वापरून गांधीजींनी बिहारमधील चंपारण्यातील शेतकऱ्यांना व गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला.

जसे जसे गांधीजींचे नेतृत्व स्थिर होऊ लागले तसे तसे ब्रिटिश सरकारचे अन्याय, अत्याचारही वाढू लागले. केवळ दबाव आणि दडपशाहीने साम्राज्य सांभाळणे अवघड आहे हे ध्यानात येताच ब्रिटिश सरकारने कधी नरम तर कधी गरम, कधी फोडा तर कधी झोडा असे धोरण अवलंबिले. पण जुलमालाही अंत असतो आणि सत्याला, न्यायाला अंधार मान्य नसतो हे कळत असूनही ब्रिटिश सरकार ते मान्य करत नव्हते. रौलट कायद्याविरुद्ध सत्याग्रह करण्याची गांधीजींनी जनतेला हाक दिली. त्या कायद्याचा निषेध करण्यासाठी पंजाबमधील जालियनवाला बागेत जमलेल्या लोकांवर सरकारने गोळीबार केला आणि आपल्या अधम, अनैतिक आणि बेकायदेशीर वर्तनाचे प्रदर्शन केले. यातूनच गांधीजींची असहकाराची चळवळ उदयाला आली.



१९२० च्या डिसेंबरमध्ये नागपूरमध्ये भरलेल्या राष्ट्रीय सभेत असहकारितेचा ठराव मंजूर झाला. असहकाराच्या चळवळीमागे निषेधाचा, प्रतिकाराचा हेतू होता. पण हा प्रतिकार अहिंसक मार्गाने व्यक्त करायचा हे त्याचे मूलगामी सूत्र होते. या चळवळीला प्रतिसाद म्हणून हजारो लोक रस्त्यावर आले. जनतेने उत्स्फूर्तपणे सरकारी न्यायालये, सरकारी शाळा-महाविद्यालये, निवडणुका व परदेशी मालावर बहिष्कार घातला. कित्येकांनी सरकारी मानसन्मानांवर पाणी सोडले. समाजातील सर्व थरातील व सर्व वयातील लोकांनी या चळवळीत भाग घेतला.

गांधीजींची असहकाराची चळवळ हे एक प्रकारचे सौम्य बंडच होते. जे आजपर्यंत चालले ते इथून पुढे चालणार नाही; इथंपर्यंत ठीक, यापुढे मुळीच नाही अशी प्रत्येक बंडखोर व्यक्तीची वृत्ती असते. गांधीजींनी देखील काहीशी अशीच भूमिका घेतली. तुम्ही जे करता आहात ते अन्याय्य आहे आणि म्हणून आम्ही ते मान्य करणार नाही; नव्हे त्याच्याविरुद्ध आम्ही असहकार पुकारू, असे त्यांचे म्हणणे होते.

१९२९ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली झालेले राष्ट्रीय सभेचे लाहोर अधिवेशन कायदेभंगाच्या चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले. या अधिवेशनात ‘संपूर्ण स्वातंत्र्या’ची मागणी करण्यात आली आणि गांधीजींच्या नेतृत्वाखाली कायदेभंगाची चळवळ करण्याचे ठरले. प्रथम गांधीजींनी सरकारला मागण्यांची यादी दिली. तिचा सरकारने साधा विचारही केला नाही; उलट पुढाऱ्यांना तुरुंगात डांबण्यास सुरुवात केली. परिणामी गांधीजींनी दांडी येथील किनाऱ्यावरील मीठ बेकायदा गोळा करण्याची घोषणा केली. ६ एप्रिल १९३० रोजी त्यांनी दांडी येथे किनाऱ्यावरचे मीठ गोळा केले. एखादी गोष्ट आटोक्यात येत नसेल तर नेत्याला अटक करण्याचे तंत्र वापरून सरकारने गांधीजींना येरवड्याच्या तुरुंगात ठेवले. मीठ हे सामान्य माणसाची दैनंदिन गरज आणि निसर्गदत्त हक्क. अशा मिठावर कर लादून सरकारने सामान्य माणसाचे जीवन बेचव करायचा प्रयत्न केला होता. परंतु गांधीजींनी त्या अन्याय्य कायद्याचा भंग करून साम्राज्यशाहीच्या मुळावरच हल्ला चढविला.

भारताला स्वातंत्र्य देण्यात ब्रिटिश सरकार दिरंगाई करू लागले. हिंदू-मुस्लिमांत त्याने बेकी निर्माण केली. भारताचे स्वातंत्र्य हेच हिंदू-मुस्लीम ऐक्यावर एकमेव व अंतिम उत्तर आहे असे गांधीजींना प्रकर्षाने जाणवू लागले. मग त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या मध्यावर ८ ऑगस्ट १९४२ रोजी ‘चले जाव’ ची घोषणा केली. ‘चले